# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**महाराष्ट्र राज्यमाध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**
**(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४**

दूरध्वनी क्र.:-०२०- २६१२३०६६/६७ वेबसाइड:-**mscepune.in** ई-मेल : mscepune@gmail.com

जा.क्र. मरापप/जी.सी.सी.प्रशा/2024/18
दि. 23/02/2024

प्रति,

प्राचार्य,
अभियांत्रिकी महाविद्यालय/पॉलिटेक्निक कॉलेज,
-----------------------------------------------.

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) 30 व 40 शब्द प्रति मिनिट, ऑनलाईन लघुलेखन परीक्षा व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर स्टुडंट्स अँड इन्स्ट्रक्टर्स (GCC-SSD-CTC)च्या परीक्षांसाठी केंद्र/संगणक लॅब उपलब्ध करुन देणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, आमची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (MSCE) ही एक स्वायत्त संस्था असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभरात आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी NMMS ची परीक्षा, पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपची परीक्षा, शिक्षकांसाठी TET. व TAIT ची परीक्षा, मशीन टायपिंग, ऑनलाईन लघुलेखन व संगणक टंकलेखनाच्या परीक्षेसह इतर अनेक परीक्षांचे आयोजन करीत असते. यामध्ये शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) सहा महिन्याच्या कालावधीचा अभ्यासक्रम असून याची परीक्षा संगणकावर वर्षातून दोन वेळा घेण्यात येते. तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आम्ही लघुलेखनाची परीक्षा देखील घेत असून त्यामध्ये इंग्रजी लघुलेखन 60, 80, 100, 120, 130, 140, 150 व 160 शब्द प्रति मिनिट, मराठी व हिंदी लघुलेखन 60, 80, 100 व 120 शब्द प्रति मिनिट अशा एकूण 16 विविध विषयांची परीक्षा घेण्यात येत असून एप्रिल 2024 पासून प्रथमच ऑनलाईन स्वरुपात संगणकावर सुरु करणार आहोत.

वरील नमूद केलेल्या सर्व परीक्षा या जिल्हा व तालुका स्तरावरील विविध महाविद्यालय, उदा. इंजिनिअरिंग महाविद्यालय, पॉलिटेक्निक, फार्मसी, एम.बी.ए., बी.एस.सी. कॉम्प्युटर कॉलेज, बारावीचे कॉम्प्युटर सायन्स विषय असलेले महाविद्यालय इत्यादी अशा विविध महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या संगणक लॅबच्या माध्यमातून घेत असतो. संपूर्ण राज्यभरातून संगणक टायपिंग साठी दरवर्षी किमान चार लाख विद्यार्थी प्रविष्ठ होत असतात. टायपिंगचा अभ्यासक्रम हा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने तयार केलेला असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर टायपिंगचे विद्यार्थी प्रविष्ठ करणारी आमची एकमेव संस्था आहे. सन 2016 पासून संगणक टायपिंगच्या परीक्षा आम्ही घेत असून त्यापूर्वी मागील पन्नास वर्षापासून आम्ही मशील टायपिंगच्या परीक्षा घेत आहोत. पुढे देखील अनेक वर्ष आम्ही हा उपक्रम सुरु ठेवणार आहोत.

2023 च्या नियमावलीनुसार आमच्या परीक्षा पहिले सत्र 1 ते 15 एप्रिल आणि दुसरे सत्र 25 डिसेंबर ते 10 जानेवारी या कालावधीत होतात. परीक्षा घेत असताना आम्हाला ढोबळ मानाने खालीलप्रमाणे साहित्य/संगणक लागत असते -

23/2

Computer Dest Top/PC -15 Inches and above, RAM 4Gb, Hard Drive Minm 256 Gb abd above, LAN or WIFI Connectivity with minm 50 mbps speed, Microsoft Office Version 2010 and above, Operating System – Windows 7 and above. Printer, Scanner etc.

टायपिंगच्या परीक्षा घेताना आमचे वर्ग-1 दर्जाचे शिक्षण विभागातीन अधिकारी सर्वसाधारण नियंत्रणासाठी नियुक्त केलेले असतात. तसेच परीक्षेचे आयोजनाकरीता आपल्याच महाविद्यालयातील संगणकाशी संबंधित असलेले प्राध्यापक/शिक्षक हे IT टिचर व तांत्रिक सहाय्यक या नावाने आम्ही आपल्याच संगणक प्रयोगशाळेसाठी नियुक्त करत असतो, जेणेकरुन आपले संगणक व प्रयोगशाळेची सुरक्षितता अबाधित राहते.

आपले अभियांत्रिकी महाविद्यालय पॉलिटेक्निक महाविद्यालय हे देखील शासनाशी संलग्न असून आपल्याकडे अनेक संगणक असलेली अद्यावत संगणक प्रयोगशाळा आहे. सदर प्रयोगशाळा काही दिवसांसाठी प्रति संगणक भाडेतत्त्वावर आम्हाला, वर नमूद केलेल्या कालावधीसाठी उपलब्ध करुन दिल्यास, आम्हाला आपल्या महाविद्यालयाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरात संगणक टायपिंग, ऑनलाईन लघुलेखन व GCC-SSD-CTC च्या परीक्षांचे आयोजन अतिशय उत्कृष्टपणे करता येऊ शकेल.

सद्य:स्थितीत आम्ही आपल्याकडील संगणक वापरण्या प्रित्यर्थ प्रति संगणक रु.40/- भाडे देत असून साधारणत: दररोज 4 ते 5 सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येते, म्हणजेच प्रति दिन भाडे 160 ते 200 रुपये देण्यात येते. तसेच आपल्या महाविद्यालयातील स्टाफ या परीक्षांसाठी वापरण्यात येतो म्हणून, प्रत्येकी 25 ते 30 संगणकांकरीता IT टिचर यांना रु. 600/- प्रतिदिन व तांत्रिक सहाय्यक यांना रु. 400/- प्रति दिन मानधन देण्यात येते. परीक्षेपूर्वी दोन दिवसांसाठी आमची excel फाईन व विद्यार्थी संसथाचालक यांना डेमो देण्याकरिता लॅब वापरण्यात येत असून आपल्या IT टिचर व तांत्रिक सहाय्यक यांना दिवसांचे देखील मानधन अदा करण्यात येते.

तरी आपल्या संस्थेमधील संगणक प्रयोगशाळा (कॉम्प्युटर लॅब) आम्हाला 1 ते 15 एप्रिल 2024 या दरम्यान उपलब्ध करुन द्यावी अशी आपणास विनंती करण्यात येत आहे. परीक्षेच्या अंतिम तारखा आपल्याला 15 ते 20 मार्च च्या दरम्यान आम्ही कळवणार आहोत.

आपल्या संस्थेसोबत काम करण्यास आम्हाला मनस्वी आनंद होत असून आपल्याकडून देखील सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा करतो. या पत्रासोबत संमती पत्र आणि परीक्षेसाठी आवश्यक असलेली चेक लिस्ट पाठवित आहोत.

**सोबत - 1. संमती पत्र नमुना**

**2. चेक लिस्ट**

**आपला स्नेही,**

23/2/24

**(डॉ.नंदकुमार बेडसे)**
**अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) तथा**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे 04.**

**प्रतिलिपी :-**

1) **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व - आपल्या स्तरावरुन वरीलप्रमाणे इंजिनिअरिंग /पॉलिटेक्निक कॉलेज यांचेशी संपर्क करुन संगणक टंकलेखन/लघुलेखनासाठी उच्च दर्जाचे परीक्षा केंद्र मिळवून या कार्यालयास तात्काळ प्रस्ताव सादर करावेत.**
2) **संगणक टंकलेखन संस्थाचालक (सर्व) यांना माहिती तथा आपले स्तरावरुन स्थानिक शिक्षणाधिकारी यांचे मदतीने परीक्षा केंद्र उपलब्ध करवून द्यावेत.**

# संमतीपत्र

प्रति,
१) मा. आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे ०१
२) विनर सॉफ्टवेअर
पुणे ४५.

महोदय,

या पत्रान्वये आपणास कळवण्यात येते कि, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत संगणक टायपिंग इंग्रंजी /मराठी /हिंदी ३०,४०,५० श. प्र. मि विषयाची परीक्षा दि.__________ ते दि.________रोजी दरम्यान घेण्यास आम्ही तयार आहोत.

या काळात आमच्या केंद्रावर संगणक प्रयोगशाळा दि.________ते दि.__________या दरम्यान आपणास परीक्षेसाठी उपलब्ध करून देत आहोत. तसेच आवश्यक तंत्रज्ञान शिक्षण,अखंडित इंटरनेट व विद्युत पुरवठा तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत आहोत.असे संमतीपत्र दिले.

आय टी टीचर चे नाव :
मोबाईल क्र.
ई-मेल :

COLLEGE ACCOUNT DETAILS
ACCOUNT NAME: -
ACCOUNT NUMBER: -
IFSC CODE: -
BRANCH NAME: -

सही
प्राचार्य नाव.
फोन नं
शिक्का

# Checklist for Exam Center (Networking)

**Name of the Exam Center:**

**Name of the IT Teacher:**

**Address:**

**Taluka:** **District:**

**Email Id:** **Mobile No:**

| Sr. No. | Particulars | Quantity | Availability Status (Yes/No) |
|---|---|---|---|
| 1 | (Mandatory)*<br>Provide us all systems MAC Addresses (Physical Network interface address) on centers letterhead with authorized signatory signed and stamped | | |
| 2 | (Mandatory)*<br>Static IP on center letter head with authorized signature & Stamp. | | |
| 3 | Microsoft Office Minimum 10 Or above | | |
| 4 | Broadband Internet with minimum 5 MBPS speed per machine. | | |
| 5 | Internet Leased Line Availability (Mention Bandwidth) | | |
| 6 | Firewall Appliances Availability | | |

# Checklist for Exam Center (Hardware)

**Name of the Exam Center:**

**Name of the IT Teacher:**

**Address:**

**Taluka:** **District:**

**Email Id:** **Mobile No:**

| Sr. No. | Particulars | Quantity | Availability Status (Yes/No) |
|---|---|---|---|
| 1 | Total No. of Labs | | |
| 2 | Dedicated Machines | | |
| 3 | Desktop PCs: Processor Above Dual Core CPUSpeed:1.5GHz or above with Compulsory Minimum 4 GB RAM, HDD with free space more than 50 GB. | | |
| 4 | LCD/LED Monitors Minimum 15 Inch & Above | | |
| 5 | Anti-Virus Software with Anti- Spam, Anti Malware, Email and Internet Security | | |
| 6 | Electricity Backup / UPS / Inverter / Generator (Minimum 4 Hours) | | |
| 7 | Flatbed Scanner | | |
| 8 | Network Laser Printer | | |
| 9 | CCTV Camera with Online View Facility, Record and Store Facility. | | |
| 10 | Biometric. | | |
| 11 | Backup Device USB Hard Drive | | |
| 12 | N-Computing (Xtenda) is not acceptable. | | |

| Checklist for Exam Center (Software /Networking) | | | |
|---|---|---|---|
| **Name of the Exam Center:** | | | |
| **Name of the IT Teacher:** | | | |
| **Address:** | | **DIST-** | |
| Taluka: | | **District:** | |
| **Email Id:** | | **Mobile No:** | |
| **Sr. No.** | **Particulars** | **Quantity** | **Availability Status (Yes/No)** |
| 1 | Windows 7(Operating System) If 32 Bit (Service Pack 1 Required) / 64 bit with dot net latest version installed | | |
| 2 | Windows 8 (Operating System) 32bit/64 bit dot net latest version installed | | |
| 3 | Windows 10 (Operating system) 32bit/64 bit. | | |
| 4 | Windows 11 (Operating system) 32bit/64 bit. | | |
| 5 | Microsoft Office Minimum 10 Or above | | |
| 6 | Application supports minimum screen resolution 1024X768. | | |

**Note: Please Mention Number of 32-bit pc and 64-bit pc.**